नि.दरखास्त क्र.०२/२०२०
आजीनाथ वि. सिताराम
**निशाणी क्रं. ४२**

<u>**धनकोतर्फे सा.क्र.०१ कडुबा दशरथ जाधव यांचा उलटतपास ऋणकोतर्फे विधीज्ञ श्री. डी.पी.काळे यांच्यामार्फत सुरु**</u>

मला मराठी लिहिता वाचता येते. दावा गट नं. २० मौजे कानडगांव येथील चालु होता. दावा अंदाजे एक दिड एकरचा होता. रावसाहेब दशरथ जाधव, आदीनाथ कडूबा जाधव व मी तो दावा दाखल केला होता. आदिनाथच्या नावाने ३ एकर क्षेत्र आहे. माझ्या नावाने चार हेक्टर ९ आर जमीन आहे. रावसाहेबच्या नावाने चार हेक्टर ३० किवा ३५ आर जमीन होती. आदीनाथच्या नावाने असलेल्या जमीनीच्या पूर्वेला दगडू गोटीराम यांची जमीन होती, पश्चीमेला टाकळी बाजारसावंगी रस्ता होता, दक्षिण बाजुला विश्वास विठ्ठल यांची जमीन व उत्तर बाजुला माझी जमीन होती. माझ्या जमीनीच्या पूर्वेला टाकळी बाजारसावंगी रस्ता आहे, पश्चीमेला सरकारी जमीन आहे, दक्षिणेला विश्वास विठ्ठल यांची जमीन, उत्तर बाजुला रामराव वाळूबा यांची जमीन आहे. रावसाहेबच्या जमीनीच्या पूर्व बाजुला सरकारी रस्ता आहे, पश्चीमेला सरकारी गायरान जमीन आहे, दक्षीणेला माझी जमीन आहे व उत्तरेला रामराव वाळूबा यांची जमीन आहे.

०२. हे म्हणणे खरे आहे की, दाव्यामध्ये सर्वांचे क्षेत्र वेगवेगळे होते. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यामधे सर्वांच्या सीमा वेगवेगळया दर्शविल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरण दाखल केले तेव्हा रावसाहेब मयत होता. रावसाहेब हा दोन तीनदा प्रकरणात तारखेला आला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्याला प्रकरण चालवायचे नव्हते म्हणून तो येत नव्हता. सिताराम यांची जमीन गट नंबर २२ मध्ये आहे. गट नंबर २० मधील माझी जमीन भुसंपादीत झाली आहे. त्याचा मावेजा मी व माझ्या भावाने घेतला आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर २० मधून पूर्व बाजुला रस्ता गेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, ऋणको यांची जमीन भुसंपादन झाली आहे. हे म्हणणे खरे आहे की, ऋणको हे गाळपेरा करुन ती जमीन कसत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पूर्वेकडील गट नंबर रस्ता २० ते ३० फुटाचा आहे. तो रस्ता जवळपास १०० ते १२५ फुट रुंदीचा आहे. ऋणकोने वादमिळकत तिच्या ताब्याबाबत किंवा मालकीबाबत दावा आमच्या विरुध्द केला नाही. माझा व ऋणकोचा वाटणीबाबत दावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा ऋणकोच्या जमीनीशी व ऋणकोचा माझ्या जमीनीशी काही देणेघेणे नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा माझ्या भावबंदकीसोबत मिळकतीबाबत वाद चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीबाबत वाद चालू आहे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीबाबत मी माझ्या

भावबंद यांना समजावून सांगितले तरी पण आमच्यात हेवेदावे सुरु आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या भावबंदाविरुध्द दावा केला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे भावबंद भांडखोर वृत्तीचे असल्याने मी त्यांच्या विरुध्द दावा दाखल केला नाही.

**०३.** सदरचे प्रकरण दाखल करण्याचे कारणाची तारीख मी निश्चीत सांगू शकत नाही. मी सदरील प्रकरण दाखल करण्याचे कारण मी आज सांगू शकत नाही. सदर प्रकरणात नि.क्र.१५ प्रमाणे तडजोड झाली होती. परंतु ऋणकोने सतावल्यमुळे प्रकरण पुढे चालले. हे म्हणणे खरे आहे की, दि.०७/०७/२०२० रोजी आम्ही तडजोड पत्रामधे एकमेकांना अडथळा करणार नाहीत म्हणून तसे तडजोड पत्र दाखल करुन सदर प्रकरण निकाली काढण्याकरीता न्यायालयात अर्ज दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र ४ प्रमाणे पोलीस संरक्षण मिळाले होते. शेती नांगरण्याकरीता पोलीस संरक्षण घेतले होते. पोलीस कधी आहे होते याची तारीख मी सांगू शकत नाही. पोलीसांनी हद्द खुणा पाहण्याकरीता भुमी अभीलेख कार्यालयातील अधिका-यांना सोबत आणले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी चुना टाकून माझ्या जमीनीच्या हद्द खूणा दाखवल्या होत्या. मी पोलीसा समक्ष नांगरणी केली नव्हती. ऋणकोणे अडथळा केला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी त्याठिकाणी पंचनामा करुन हद्द खुणा कायम केल्या होत्या. पंचनाम्याला गावातील माझ्यासह आठ ते दहा लोक उपस्थीत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये तंटामुक्ती अध्यक्ष, व इतर प्रतिष्ठीत व्यक्ती तेथे हजर होत्या. हे म्हणणे खरेनाही की, रावसाहेब याने पंचनामा मान्य असल्यामुळे त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, बाजरसावंगी टाकळी रोडच्या पश्चीम बाजुला ही कारवाई घडली. ती कारवाई रस्त्यावरती झाली.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2025.12.17 11:49:22 +0530

फेरतपास नाही.
दिनांक १५.१२.२०२५

(**जी.डी. गुरनुले**)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
खुलताबाद.